स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**रासेयो/२०२३–२४/५७७७** **दि. ०८/०१/२०२४**

**प्रति,**
**मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**
**फक्त नाशिक शहरामधील महाविद्यालये,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : राष्ट्रीय युवा महोत्सव – २०२४ मध्ये स्वयंसेवक उपस्थितीबाबत**
**संदर्भ क्र. १ : क्रमांक:युएनआय/युवा महोत्सव/नाशिक/विशि/९२, दि. ०४ जानेवारी, २०२४, मा. शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र**
**संदर्भ क्र. २ : क्रमांक:रासेयो–२०२४/प्र.क्र.१/रासेयो कक्ष, दिनांक ०८ जानेवारी, २०२४, मा. राज्यसंपर्क अधिकारी कार्यालय यांचे पत्र**

महोदय,

भारत सरकार, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने २७वा राष्ट्रीय युवा महोत्सव–२०२४ नाशिक, महाराष्ट्र येथे दि. १२ ते १६ जानेवारी, २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आलेला आहे.

दिनांक १३ ते १५ जानेवारी, २०२४ दरम्यान, सकाळी १०.०० ते सायं. ०४.०० या वेळेत युवक महोत्सवामध्ये युथ कन्व्हेंशन व सुविचार या कार्यक्रमांतर्गत देशभरातील विविध मान्यवरांची व्याख्याने, चर्चासत्र आणि विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मा. राज्यसंपर्क अधिकारी कार्यालय, रासेयो मुंबई व मा. शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पाठवलेल्या वरील संदर्भीय पत्रानुसार नाशिक शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांना आवाहन करण्यात येते की दिनांक १३ ते १५ जानेवारी, २०२४ दरम्यान, सकाळी १०.०० ते सायं. ०४.०० या कालावधीत उपरोक्त ठिकाणी सहभागी होण्याबाबत सुचित करावे. राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/युवा महोत्सव/नाशिक/विशि / १२ दि. ४जानेवारी, २०२४

- 4 JAN 2024

**परिपत्रक**

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण

**विषय २७ वा राष्ट्रीय युवा महोत्सव, नाशिक या कार्यक्रमासाठी नोंदणी करून सहभाग घेण्याबाबत**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचेतर्फे २७ वा राष्ट्रीय युवा महोत्सव स्वामी विवेकानंद यांच्या १६१ व्या जयंतीनिमित्त दि.१२-१६ जानेवारी, २०२४ दरम्यान नाशिक येथे आयोजित करण्यात आला आहे.

Viksit Bharat@2047 through Youth या संकल्पनेवर आधारीत युवा महोत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणात सहभाग घेणे अपेक्षित आहे. या महोत्सवात विविध राज्यातील विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रमापासून ते युवाकृती प्रदर्शन, फूड फेस्टीव्हल व भारतीय संस्कृतीचे दर्शन, क्रीडा प्रकारांचे सादरीकरण करणार आहेत. महाराष्ट्रातील विद्यापीठे, महाविद्यालये, उच्च शैक्षणिक संस्था मधील विद्यार्थ्यांनीही या महोत्सवात सहभाग घेण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक असून यासाठी mybharat.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यासाठी युजर मॅन्युअलची मदत घ्यावी.

त्यासाठी आपल्या विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या महोत्सवात मोठया संख्येने सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे तसेच विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय

सेवा योजनेचे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांना महोत्सवासाठी स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यास आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी विद्यापीठाशी संपर्क करून विषयांकित प्रकरणी विद्यार्थ्यांची, स्वयंसेवकांची मोठया संख्येने नोंदणी करून घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी होतील याबाबतची दक्षता घ्यावी.

**(डॉ.प्रकाश बच्छाव)**
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत -मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महानगरपालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-२२६७ ९५६५
ई-मेल:- nssmantralaya@gmail.com

क्रमांक:रासेयो-२०२४/प्र.क्र.१/रासेयो कक्ष

दिनांक : ०८ जानेवारी, २०२४

प्रति,

कार्यक्रम समन्वयक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**विषय:** राष्ट्रीय युवा महोत्सव (NYF)-२०२४.
स्वयंसेवक उपस्थितीबाबत...
**संदर्भ:** या विभागाचे समक्रमांक, दि.०५.०१.२०२३ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने भारत सरकार, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकार २७ वा राष्ट्रीय युवा महोत्सव-२०२४ नाशिक, महाराष्ट्र येथे १२ ते १६ जानेवारी, २०२४ या कालावधीत होणाऱ्या कार्यक्रमामध्ये दिनांक १३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत युथ कन्व्हेंन्शन व सुविचार या कार्यक्रमांतर्गत सकाळी १०.०० ते दु.०४.०० वा. दोन सत्रांमध्ये विख्यात मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आलेली आहेत. सदर व्याख्यानांचा लाभ घेण्याकरीता नाशिक शहरातील १२ ते १५ महाविद्यालयांतील स्वारस्य असलेल्या ५०० स्वयंसेवकांना उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(डॉ. निलेश मो. पाठक)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी